**OFFICE OF THE DEAN**
**GOVT. AYURVED & UNANI PHARMACY, VAZIRABAD NANDED**
**अधिष्ठाता यांचे कार्यालय,**
**शासकीय आयुर्वेद व युनानी रसशाळा, वजिराबाद, नांदेड**

दुरध्वनी क्रं.02462-234567 EMAIL :- gaupnanded34@gmail.com

जा.क्र.शाआवयुरनां/लेखा-३/ 80-82 / 2021 दिनांक / 2 / 01 / 2021

## जाहिर लिलाव

रसशाळेतील निर्लेखित यंत्रसामुग्री/किरकोळ वस्तूचा लिलाव, आहे त्या स्थितीत लिफाफा पध्दतीने करावयाचा आहे. त्यासाठी नोंदणीकृत खरेदीदाराकडून सीलबंद दरपत्रक मागविण्यात येत आहे. लिलाव करावयाची यंत्रसामुग्री/किरकोळ वस्तूची या रसशाळेत दि.१४.०१.२०२१ ते दि.२२.०१.२०२१ या दरम्यान ११.०० ते ०५.३० (सार्वजनी सुट्या वगळून) वाजेपर्यंत पहावयास मिळेल.

पूर्ण भरलेले दरपत्रका सोबत रु. १०००/- रुपये (अक्षरी रुपये एक हजार फक्त) अनामत रक्कम राष्ट्रीयकृत बॅकेच्या डी.डी स्वरुपात "अधिष्ठाता शासकीय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा नांदेड" या नावाने काढून दिनांक १४.०१.२०२१ ते दि. २२.०१.२०२१ दरम्यान संध्याकाळी ०५.३० वाजेपर्यंत सीलबंद पाकिटात शासकीय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा, वजिराबाद, नांदेड येथे जमा करावे.

सर्व सीलबंद दरपत्रक दिनांक २५.०१.२०२१ रोजी दुपारी ०२.०० वाजता आधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड यांच्या कक्षात उघडण्यात येतील. आपण/आपले प्रतिनिधी सिलबंद दरपत्रक उघडतेवेळी उपस्थित रहाने अपेक्षित आहे.

(डॉ. वाय.आर.पाटील)
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा,
नांदेड.

**OFFICE OF THE DEAN**
**GOVT. AYURVED & UNANI PHARMACY, VAZIRABAD NANDED**
**अधिष्ठाता यांचे कार्यालय,**
**शासकीय आयुर्वेद व युनानी रसशाळा, वजिराबाद, नांदेड**
दुरध्वनी क्रं.02462-234567 EMAIL :- gaupnanded34@gmail.com

| जा.क्र.शाआवयुरनां/लेखा-३/ 80-82 / 2021 | दिनांक / 21 / 01 /2021 |
|---|---|

**रसशाळेतील निर्लेखित यंत्रसामुग्री/किरकोळ वस्तूची लिलाव पध्दतीने विक्री करणेबातच्या नियम, अटि व शर्ती.**

शासकीय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा, नांदेड येथील निर्लेखित केलेले यंत्रसामुग्री/किरकोळ वस्तूची दरपत्रक पध्दतीने (जेथे आहे तेथुन व जशी आहे त्या प्रमाणे) विक्री करणे आहे.

१. खालील निर्लेखित यंत्रसामुग्री/किरकोळ वस्तू ह्या रसशाळेत कार्यालयीन वेळेत पाहण्यास उपलब्ध असतील.

२. सदर दरपत्रक दि. २२.०१.२०२१ पर्यंत सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत पोहचतील अश्या पध्दतीने मोहोरबंद पाकिटात पाठवाव्यात. विहित वेळेत प्राप्त दरपत्रक दि.२५.०१.२०२१ रोजी दुपारी २.०० वाजता उघण्यात येतीलय. दरपत्रक उघडतेवेळी दरपत्रकधारकास/प्रतिनिधीस उपस्थित राहण्यास परवानगी आहे.

३. कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक स्वीकरण्याचे अथवा नाकरण्याचे अधिकर मा. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा, नांदेड यांच्याकडे राखुन ठेवण्यात आले आहेत, कृपया याची नोंद घ्यावी.

४. ज्या इच्छुक खरेदी दारास सदर यंत्रसामुग्री/किरकोळ वस्तू खरेदी करावयाचे आहे. त्यांनी सदर यंत्रसामुग्री/किरकोळ वस्तूची प्रत्यक्ष पाहणी करुन त्याबाबतचे खरेदी करावयाचे दरपत्रकचे दर दरपत्रकामध्ये नमुद करुन बंद लिफाफ्यात या दरपत्रक सुचनेच्या खाली नमुद वेळापत्रका नुसार विहीत दिनांका पुर्वी कार्यालयीन वेळेत समक्ष अथवा पोस्टाने सादर करणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत सदर दिनांका नंतर प्राप्त होणाऱ्या (हस्ते किंवा पोस्टाने) दरपत्रक स्विकारल्या जाणार नाहीत. यास्तव विहित दिनांका पुर्वी दरपत्रक शासकीय आयुर्वेदीक व युनानी रसशाळा, वजिराबाद, नांदेड या कार्यालयात पोहोचविण्याची जबाबदारी संबंधित दरपत्रक धारकाची राहील. या बाबत कोणतीही तक्रार चालनार नाही.

५. अनामत रक्कम रु. १०००/- ची राष्ट्रीयकृत बॅकेचा डी.डी **आधिष्ठात, शासकीय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा, नांदेड** यांच्या नावे काढून दरपत्रका सोबत सादर करण्यांत यावी.

६. सदर विक्री ही लिलाव पध्दतीने करण्यात येणार असल्याने बंद लिफाफ्यावर **"निर्लेखीत यंत्रसामुग्री/किरकोळ वस्तूची खरेदीसाठी दरपत्रक"** असे स्पष्ट नमुद करुन यंत्रसामुग्री/किरकोळ वस्तू खरेदी करावयाचे प्रति **वस्तू दर दर्शविणारी** दरपत्रक सादर करण्यात यावी.

**सदर दरपत्रका सोबत दरपत्रकधारकाचे पॅनकार्ड आधारकार्ड व फर्म असल्यास नोंदणीचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.**

७. दरपत्रक उघडण्याच्या विहित वेळेस संबंधित दरपत्रकधारकास/प्रतिनिधीस व्यक्तीशः उपस्थित राहता येईल. व त्याबाबत अनुपस्थित दरपत्रककाराची कोणतीही तक्रार चालणार नाही.

८. यशस्वी दरपत्रक धारकास मंजूर दरपत्रक रक्कमेतून अनामत रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम कार्यालयीन पाच दिवसात भरणा करुन साहित्य ताब्यात घेणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची दरपत्रक रद्दबातल ठरवली जाईल व अनामत रकमेस त्यास मुकावे लागेल.

९. यशस्वी दरपत्रक धारकाने त्या यंत्रसामुग्री/किराकोळ वस्तूचे दर लिलववात मंजूर करण्यांत आलेली रक्कम भरणा केल्यानंतर तात्काळ सदर यंत्रसामुग्री/किरकोळ वस्तू आहे त्या ठिकाणाहून स्वखर्चाने ताब्यात घेणे आवश्यक राहील त्यासाठी मनुष्यबळ किंवा इतर कोणताही खर्च देण्यात येणार नाही.

१०. यशस्वी दरपत्रक धारकांने दरपत्रक मंजूरी नंतर कोणत्याही कारणास्तव साहीत्य घेण्यास नाकार दिल्यास त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त करुन शासन खाती जमा करण्यात येईल व सदर रक्कम कोणत्याही परिस्थितीत परत दिली जाणार नाही.

११. दरपत्रका बाबत दरपत्रक धारकाची कोणतीही अट स्वीकारली जाणार नाही.

१२. कोणतेही कारण न देता दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही टप्यावर नाकरणे याचे संपूर्ण अधिकार मा. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा, नांदेड यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१३. यशस्वी दरपत्रक धारक वस्तू ताब्यात घेतानी कार्यालयाच्या मालमत्तेचे नुकसार झाल्यास त्या मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई द्यावी लागेल.

| अ.क्र. | दरपत्रक प्रक्रिया तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| ०१ | दरपत्रक प्रसिध्द झाल्याचा दिनांक | दि.१४.०१.२०२१ ते दि.२२.०१.२०२१ |
| ०२ | विक्री करावयाचे निर्लेखित साहित्य पाहण्याचा कालावधी (कार्यालयीन वेळेत) | दि. १४.०१.२०२१ ते दि.२२.०१.२०२१ सध्याकाळी ५:०० वाजे पर्यत |
| ०३ | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी (कार्यालयीन वेळेत) | दि. १४.०१.२०२१ ते दि.२२.०१.२०२१ सध्याकाळी ५:०० वाजे पर्यत |
| ०४ | दरपत्रक उघडण्याचा दिनांक | दि. २५.०१.२०२१ दुपारी २:०० |
| ०५ | यशस्वी दरपत्रक धारकास संपूर्ण रक्कम भरणा करुन सदर साहित्य ताब्यात कालावधी (कार्यालयीन वेळेत) | कार्यालयीन पत्र प्राप्त नंतर ५ दिवयाच्या आत |

(डॉ. वाय.आर.पाटील)
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा, नांदेड.